## प्रकरण तिसरे

## कोल्हापूर जिल्हातील नागरी सहकारी बँका

३.१ ऐतिहासिक पार्श्वभूमि
३.२ अर्बन बँकेची स्थापना : सहकाराचा शुभारंभ
३.३ कोल्हापूर जिल्हातील बँकांचा विस्तार
३.४ कोल्हापूर जिल्हातील नागरी सहकारी बँकांचा तपशील
३.५ उपसंहार

## प्रकरण तिसरे

## कोल्हापूर जिल्हातील नागरी सहकारी बँका

### ३.१ ऐतिहासिक पार्श्वभूमि :

श्री. करवीर निवासिनी, श्री. महालक्ष्मी देवीच्या सानिध्याने ' दक्षिण काशी ' म्हणून प्रसिध्दीस पावलेले श्री. पंचगंगा नदीच्या काठी वसलेले कोल्हापूर हे कलापूर म्हणून प्रसिध्द आहे. अनेक कलागुणांनी युक्त अशी ही करवीरची भूमी आहे. या कलागुणांच्या विकासासाठी काही प्रेरक शक्ती कारणीभूत झाल्या आहेत. त्यात सामाजिक बांधिलकीने झपाटलेले छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांचा सर्वात मोठा वाटा आहे. म्हणूनच हे कलापूर अधिक विकसित झाले.

दिनांक २-४-१८९४ रोजी छत्रपती शाहू महाराज गादीवर आल्यापासून आपल्या प्रजेची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, उन्नती व्हावी यासाठी प्रयत्नशील होते. शेती सुधारण्यासाठी त्यांनी पतपुरवठा केला. परंतु बिगर शेतकरी बहुजन समाज मात्र पैशासाठी महाजन, सावकार आणि पठाण यांच्या कचाट्यात सापडला होता. सर्वांना पतपुरवठा करणे अडचणीचे होते. म्हणून लोकांनी सामुदायिक संस्था काढून उद्योग, व्यापार करावा. पतपेढ्या काढाव्यात असा विचार महाराजांच्या मनात घोळत होता.

१९१३ पूर्वी कोल्हापूर संस्थानात आजच्या जिल्हातील सर्व तालुके होते. लोकांच्या गरजा प्रामुख्याने शेतीसंबंधी होत्या. साहजिकच कर्ज घेणारा प्रमुख घटक शेतकरी होता. व्यापार, उद्योग व घरगुती कारणांसाठी कर्ज घेणाऱ्यांना कर्ज मिळत नसे. कारण कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था नव्हत्या. त्यामुळे त्यांची कुचंबना होत असे. अशावेळी कुलकर्णी व सावकार खेड्यातील लोकांना कर्ज पुरवठा करून, लोकांना लुबाडून श्रीमंत होण्यास हपापलेले असत. बहुतेक सावकार, महाजन, ईंपिरियल बँक व संस्थानची द्रेझरी कर्जाच्या गरजा

मागवत असत. १८९१ सालात २९४६ सावकार असल्याची नोंद आहे. त्यांनी शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाची एकूण रक्कम रूपये १,०८,३४,०००-०० होती.[१] सावकारी कर्जाच्या व्याजाचे दर १२ टक्क्यांपासून ३० टक्क्यांपर्यन्त असत. सावकार वर्ग कर्जदारांची घरे कशी गिळंकृत करता येतील याकडेच अधिक लक्ष देत, म्हणून कोल्हापूर इलाख्यात एका जाहिरनाम्याने " परस्थ पठाण लोकांनी इलाखे मजकूरी सावकारी व्यवहार करणेचा तो फक्त जंगम जिनगीवर करणेचा आहे स्थावर मिळकतीवर करणेचा नाही "[२] असे बंधन घातले.

शेती सुधारणेबाबत आणि व्यापार, उद्योगधंदे वाढविणेबाबत तत्कालीन ब्रिटीश सरकार उदासीन होते. याउलट शेती, व्यापार व उद्योगधंदे यांची प्रगती व्हावी अशी शाहू महाराजांची धारणा होती. तथापि त्यावेळी अस्तित्वात असलेल्या आर्थिक पतपुरवठ्यामुळे सर्व उद्योग मूठभर लोकांच्या हातात होते. पुरेसा पतपुरवठा आणि व्याजाचा दर कमी नसल्यामुळे बहुसंख्य लोकांना आर्थिक पुरवठा होत नव्हता. गरीब शेतकरी, लहान व्यापारी, छोटे कारखानदार व कारागीर यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांना कमीत कमी व्याजात कर्जपुरवठा करणेचे धोरण स्वत: शाहू महाराजांनी राबविले.

" माझ्या प्रजेतील समर्थ घटकांपेक्षा दुबळ्या घटकांची काळजी अधिक घेणे हे माझे तत्व राहिले आहे "[३] महाराजांचा दृष्टिकोन शेती कर्ज व इतर कर्जे याबाबतीत प्रतिबिंबीत झालेला आढळतो. तसाच तो भावी बँक उभारणीच्या तत्वप्रणालीचा पायाही ठरतो.

शेती कर्जाबाबत शाहू महाराजांनी काढलेला खालील वटहुकूम ज जाहिरनामा अगदी बोलका आहे.[४]

१) फंडाच्या रक्कमा सरकारात (ठेव) आहेत ज्या लोकांना व्याजाने देणेची तजवीज चालू आहे त्यात लोकांनी अर्ज केलेनंतर ते तपासाकरीता मामलेदार, महालकरी यांजकडे पाठविले जातात.

२) करवीर इलाख्यातील रयतेस कर्ज देणे ते खालील कारणाकरिता देणेत यावे :

अ) शेतकीच्या जमिनीवरील पूर्वीचे गहाण कर्ज फेडणेकरिता,

ब) शेतकीची सुधारणा, विहीर काढणे, पंप लावणे, नवीन औत घेणे वगैरेकरिता,

क) दुष्काळाचे साली आवश्यक असणाऱ्या निर्वाहाची साधने घेणेकरिता, याखेरीज दुसऱ्या कोणत्याही कारणाकरिता दरबारने शेतकऱ्याशी देण्या-घेण्याचा व्यवहार करू नये.

इतर कारणाकरिता कर्जपुरवठा करता यावा म्हणून मुदतबंद ठेवी व निधी हुजूर ट्रेझारीकडे शाहू महाराजांनी वळविला. त्यावर ५ ते ६ टक्क्यापर्यन्त व्याज देण्यात येई. यामुळे जनतेला मुदतबंद ठेवीत पैसे गुंतविणे किफायतशीर व सुरक्षित झाले. तसेच व्यापारी व उद्योजकांना कमी व्याज दरात कर्जपुरवठा करणे शक्य झाले. संस्थानची आर्थिक क्षमता मर्यादित असल्याने हव्या त्या प्रमाणात पतपुरवठा करणे दरबारला अवघड होऊ लागले. म्हणून कायम स्वरूपी पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची स्थापना करण्याची आवश्यकता भासू लागली. त्यावेळी म्हणजे १९०४ मध्ये भारत सरकारचा सहकाराचा कायदा झाला होता. शाहू महाराजांनी त्या संदर्भात मुंबई इलाख्याशी पत्रव्यवहार करून माहिती, पोटनियम व इतर जरूर ते कागदपत्र मागवून घेतले. त्यांचे वाचन केले. संस्थानात सहकारी संस्था स्थापन करण्यावर त्यांनी पुढे भर दिला. " आर्थिक संपन्नता औद्योगिकरणावर अवलंबून आहे. लोकांनी एकत्र येऊन सहकारी कारखाने, सहकारी संस्था व सहकारी बाजार-पेठांची व्यवस्था राबविली पाहिजे. कोल्हापूर संस्थान त्याकरिता सर्व प्रकारची मदत देण्यास तयार आहे."[5]

यावरून हे स्पष्ट होते की, कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे प्रणेते शाहू महाराज होते. सहकारी चळवळीचा उगम प्रथम युरोपमध्ये

१९ व्या शतकात झाला. औद्योगिक क्रांतीमुळे मरडून निघालेल्या श्रमिक व सामान्य लोकांच्या गरजेतून तो निर्माण झाला. आपल्या देशात आणि विशेषत: कोल्हापूर जिल्हात औद्योगिक क्रांती व्हावी, सावकरांच्या पिळवणूकीतून लोकांची सुटका व्हावी, आर्थिक गरजा मागविता आल्या पाहिजेत या विचारसरणीतून ' सहकार ' जन्मास आला. दोन्ही देशातील सहकाराच्या जन्माच्या या मूलभूत विरोधाभासामुळे आपल्या देशाची सहकारी चळवळ कोणते रूप धारण करणार व कोणत्या दिशेने वाटचाल करणार याकडे सहकार प्रेमींचे लक्ष लागून राहिले होते.

## ३.२ अर्बन बँकेची स्थापना - सहकाराचा शुभारंभ :

सहकारी संस्था स्थापन होण्यापूर्वी दि बँक ऑफ कोल्हापूर, ईंपिरियल बँक ऑफ इंडिया, पोस्टल बँक, सोलापूर बँक, जगद्गुरू बँक, सदर्न मराठा बँक या बँका अस्तित्वात होत्या. तथापि त्या काळातही व्यापारी बँकाबद्दल जनमानसात चांगले मत असल्याचे दिसत नाही. उद्योजक, व्यापारी व सामान्य प्रजाजन याना पुरेसा आर्थिक पतपुरवठा होत नव्हता. व्यापारी बँकाबद्दल सामान्य माणसे नाराज होती. सावकार गोरगरिबांची पिळवणूक करीत होते. सहकाराच्या माध्यमातून हे प्रश्न सोडविण्याचा शाहू महाराजांना ध्यास लागला होता. त्याच वेळी हिंदुस्थानात १९०४ साली सहकारी कायदा करण्यात आला. या कायद्यानंतर देशात स्थापन झालेल्या सोसायट्यांचा कारभार विचारात घेऊन १९१२ साली ' ऑल ईंडिया को-ऑप. सोसायटीज् अॅक्ट ' हा सुधारित कायदा मंजूर करण्यात आला. हाच कायदा संस्थानात १९१३ साली शाहू महाराजांनी लागू केला. ' दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. सोसायटी लि. ' (आताची दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक) हिची संस्थानातील पहिली सोसायटी म्हणून दि. २४-५-१९१३ रोजी स्थापना करण्यात आली आणि सर्व सहकारी संस्थांची जननी म्हणून अर्बन बँककडे पाहिले जाऊ लागले. कोल्हापूर जिल्हातील सहकारी चळवळीचे प्रणेते

छ. शाहू महाराज होते, तर ना. भास्करराव जाधव यांना कोल्हापूरातील सहकारी चळवळीचे ` जनक`` मानले जाते. कारण त्यांच्याच नेतृत्वाखाली कोल्हापूरात ` दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि.` ही संस्था स्थापन झाली.

समाजातील गरीब, दुबळे, रोजंदारीवर जगणारे, नगरपालिकेतील कर्मचारी, भंगी, झाडूवाले वगैरेंना पठाणांच्या, सावकारांच्या मगरमिठीतून सोडविण्यासाठी सहकारी चळवळीचा चांगला उपयोग होईल. ही गोष्ट कै.ना. भास्करराव जाधव यांनी कै. राजर्षि शाहू महाराजांच्या निदर्शनास आणून दिली. आणि त्यांच्या प्रेरणेने सहकाराचे पहिले रोपटे दिनांक २४-५-१९१३ रोजी ` दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. सोसायटी लि. ` च्या माध्यमाने लावले. भास्कररावांनी नगरपालिकेतच या संस्थेची स्थापना केली, ते स्वत:च या सोसायटीचे संस्थापक-अध्यक्ष होते. ही सोसायटी काढण्या-मागील हेतू त्यांनी खालीलप्रमाणे स्पष्ट केला.

` मजूर, कारागीर, लहान व पतीचे व्यापारी, कारकून, शेतकरी वगैरे सर्व दर्जाच्या व धंद्यांच्या लोकास थोड्याबहुत रकमेची जरूरी लागते, ती भागविणेकरिता जबर व्याजाने कर्ज काढावे लागते. त्यामुळे नफा, व्याजात जाऊन धंदा उर्जीत स्थितीत येत नाही. ही अडचण दूर व्हावी, व्यक्तीच्या फायद्याकडे न पाहता सार्वजनिक हिताकडे लक्ष देऊन एकजूटीने काम करणेची लोकांना सवय लागावी, त्यांची चालरित व दानत सुधारून ते सद्वर्तनी व्हावेत, गरीब लोकास थोडा-थोडा संचय करणेची सवय होऊन त्यांची पत वाढावी. वगैरे अनेक हेतू ही संस्था काढण्याचे आहेत.`[६]

औपचारिकपणे या संस्थेची स्थापना ता. २४ मे, १९१३ रोजी करण्यात आली. तिचे कामकाज नगरपालिकेतील एका छोटयाशा खोलीत चालू झाले. प्रारंभी संस्थेचा पत्ता ` म्युनिसिपल ऑफीस, कोल्हापूर ` असा होता. संस्था रजिस्टर करण्यासाठी प्रकरण संस्थानच्या कार्यालयाकडे पाठविले.

संस्था प्रत्यक्ष ३० सप्टेंबर, १९१३ रोजी रजिस्टर झाली. अर्बन बँक स्थापन करताना धर्म, जात, आर्थिक आर सामाजिक उच्चनीचता इत्यादी कसलाच विचार संस्थापकांच्या समोर नव्हता. ७५ वर्षांपूर्वीच्या काळात वर्णव्यवस्थेचा पगडा पाहाता, जातीपातीचा अडसर बाजूला ठेवून एकत्र येणे हेच मुळी मोठे परिवर्तन होते. अशाप्रकारे छ. शाहू महाराजांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या ' दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. सोसायटी लि.,' या संस्थेने कोल्हापूरात सहकारी बँकांची मुहतमेढ रोवली गेली.या बँकेने अर्बन बँकिंगमध्ये चळवळीचे नेतृत्व केले.

कोल्हापूर अर्बन बँकेनंतर कृषि क्षेत्रात शेती आणि शेतक-यांच्या विकासाकरिता उभी राहिलेली ' कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.' ही या जिल्हाच्या कृषि औद्योगिक विकासाची गंगोत्री आहे. कोटयावधी रूपयांचा कर्जपुरवठा आणि त्याद्वारे हजारो सहकारी संस्था, ११ सहकारी साखर कारखाने, देशातील सर्वोत्तम अशा चार सहकारी सूत गिरण्या आणि शेतकरी सहकारी संघासह अनेक खरेदी-विक्री संघ, कोल्हापूर जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघ इत्यादी सर्व सहकारी चळवळीची उभारणी ही देशाला दिशा देणारी आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचा कर्जपुरवठा हा देशात आणि राज्यात दुस-या क्रमांकाचा, तर ९५ ते ९६ टक्के कर्जवसुली ही देशात पहिल्या क्रमांकाची आहे. त्यातही वैशिष्टय म्हणजे शेती कर्ज वसुलीपैकी ८५ टक्के कर्ज वसुली ही सहकारी यंत्रणेमार्फत शेतीमालाच्या विक्रीतून साखळी पध्दतीने होते आणि हेच कोल्हापूर जिल्हाच्या सहकारी चळवळीच्या यशाचे गमक आहे.

कोल्हापूरच्या सहकारी चळवळीने आज देशाला आणखी एका क्षेत्रात नवी दिशा दिली आहे. सह्याद्रीच्या कडयाकपारीत राहणारा कोल्हापूरचा शेतकरी निसर्गाच्या लहरी पावसावर विसंबून नशिबाला दोष देत, कपाळाला हात लावून बसणारा दुबळा नाही, तर सहकाराच्या सुधशक्तीवर एकत्रये येऊन डोंगरावरून धो-धो वाहणारी नदी अडविण्यासाठी

सहकारी तत्वावर धरण बांधणारा भारतातील भगिरथाचा खराखुरा वारस आहे. सांगळ सहकारी धरण सोसायटी सारख्या ८-१० सहकारी धरण सोसायटया आज हजारो एक ऊस शेतीला पाणी पुरवठा करीत आहेत.

त्याचबरोबर सहकारी तत्वावर प्रचंड उपसा जलसिंचन योजना या जिल्हातील कष्टकरी शेतकऱ्यांनी स्वत:च्या ताकदीवर यशस्वी केल्या आहेत. ३० जून, १९८७ अखेर कोल्हापूर जिल्हामध्ये एकूण ४०७ सहकारी पाणी पुरवठा संस्था असून जवळजवळ ५५ हजार एकर क्षेत्रास त्या पाणी पुरवठा करीत असून शेती विकासात त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे.

देशाला आदर्श ठरणारा असाच आणखी एक अभिनव उपक्रम कोल्हापूरच्या एका छोटयाशा सहकारी संस्थेने सुरू केला आहे. अलिकडे देशामध्ये किंवा जगामध्ये कामगार, कर्मचारी यांना मासिक पगाराखेरीज त्यांना त्यांच्या भविष्यकाळाची तरतूद म्हणून ' भविष्य निर्वाह निधी योजना ' (प्रॉव्हिडंट फंड स्कीम) लागू केली आहे. दुर्दैवाने सर्व समाजासाठी मूलभूत धन निर्माण करणारा शेतकरी मात्र या योजनेपासून पूर्णपणे वंचित आहे. याचा विचार करून करवीर तालुक्यातील ' पाडळी खुर्द ' या गावच्या' जनसेवा विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचे " शेतकरी प्रॉव्हिडंट फंड योजना " सन १९८१ पासून अंमलात आणली आहे.

या योजनेत शेतकऱ्याने काढलेल्या कर्जाच्या प्रमाणात त्याची प्रॉव्हिडंट फंड वर्गणी घेतली जाते व संस्था आपल्या मिळकतीतून त्यात संस्थेची वर्गणी म्हणून काही रक्कम घालते. याप्रमाणे गेली सात वर्षे ही योजना अत्यंत यशस्वीरीत्या चालविली जात आहे. सहकारी साखर कारखान्यांनी ही योजना राबवावी म्हणून कोल्हापूरच्या कुंभी-कासारी सहकारी साखर कारखान्याने अलिकडे ही योजना स्वीकारून ती शासनाच्या मान्यतेसाठी केंद्राकडे पाठविली आहे.

छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत सुध्दा सहकारी चळवळीस योग्य ते उत्तेजन मिळाले आणि वणव्याप्रमाणे ही चळवळ कोल्हापूर जिल्हात पसरलेली दिसत आहे. जुन्या कोल्हापूरातील सहकारी चळवळीच्या अनुभवाचा महाराष्ट्रात ही चळवळ रुजविण्यासाठी व वाढविण्यासाठी बराच उपयोग झाला. कृषि विषयक व इतर सहकारी संस्थांची कोल्हापूर जिल्हातील आजची संख्या, ठेवी, भाग भांडवल (सहकारी भाग भांडवल वगळून) रिझर्व्हस, कामाचा व्याप, वगैरेंची महाराष्ट्र पातळीशी तुलना केली असता त्यांचे व्यापक स्वरूप ध्यानात येते. त्यामुळेच हा जिल्हा सहकाराबाबत महाराष्ट्रात आदर्श ठरला आहे.

## ३.३ कोल्हापूर जिल्हातील बँकांचा विस्तार :

अर्बन बँकेच्या स्थापनेनंतर संस्थानातील निरनिराळ्या भागात पतसंस्था व इतर सहकारी संस्था अस्तित्वात येऊ लागल्या. ना.भास्करराव जाधव यांनी स्वत: आणखी काही संस्था स्थापन केल्या. इतरांना प्रोत्साहन दिले. १९१७ सालापर्यन्त खालील संस्था रजिस्टर होऊन काम करीत होत्या.[७]

१) दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.
२) बलभिम को-ऑपरेटिव्ह सोसायटी
३) वरूणतीर्थ को-ऑप. सोसायटी
४) कोल्हापूर स्टेट सर्व्हन्टस् को-ऑफ. सोसायटी
५) सत्यमार्गदर्शक को-ऑप. सोसायटी
६) गडहिंग्लज परस्पर सहाय्यकारक को-ऑप. सोसायटी
७) श्रीमंत नारायणराव घोरपडे दत्तवाड को-ऑप. सोसायटी
८) दि निल्लेवाडी को-ऑप. सोसायटी
९) कुंभोज को-ऑप. सोसायटी
१०) ठाणे को-ऑप. सोसायटी

वरील सोसायटयांपैकी अ.नं. १, २ व ४ या सोसायटया पुढे बँका म्हणून काम करू लागल्या. सुरूवातीच्या काळात या संस्था मर्यादित आणि अमर्यादित जबाबदारी या दोन्ही प्रकारे काम करीत होत्या. सन १९४५-४६ च्या अखेरीस सर्व प्रकारच्या संस्था मिळून एकूण ४६१ सहकारी संस्था कार्यरत होत्या. त्यापैकी बँका व पतसंस्था खालीलप्रमाणे होत्या :

सारणी क्र. ३.१

कोल्हापूरातील बँका व पतसंस्था

| | बाब | अमर्यादित | मर्यादित | एकूण |
|---|---|---|---|---|
| १) | बँका | - | ८ | ८ |
| २) | पतसंस्था (बिगर शेती) | ७ | १२ | १९ |
| ३) | मागासवर्गीय पतसंस्था : | | | |
| | अ) शहरी विभाग | ५ | - | ५ |
| | ब) ग्रामीण विभाग | ३५ | - | ३५ |
| | एकूण : | ४७ | २० | ६७ |

आधार : अँड. शामराव शिंदे - कोल्हापूर जिल्हातील नागरी सहकारी बँका - अमृत महोत्सव स्मरणिका, १९८८, पा.क्र. ८८

वरील सारणीवरून हे स्पष्ट होते की, १९४५-४६ च्या अखेरीस अमर्यादित व मर्यादित जबाबदारीच्या संस्थांची (बँका व पतसंस्था) संख्या ६७ होती. म्हणजेच एकूण सर्वप्रकारच्या सहकारी संस्थेत त्यांचे प्रमाण फक्त १५ टक्के होते. विशेषत: या काळात मर्यादित जबाबदारीच्या तत्वानुसार ८ सहकारी बँका अस्तित्वात होत्या. मात्र अमर्यादित जबाबदारीनुसार एकही बँक स्थापन झालेली नव्हती.

सारणी क्र. ३.२

महाल व पेटा यांमधील बँका व सोसायटया

| महाल-पेटा[७] | सोसायटया | बँका |
|---|---|---|
| १) कोल्हापूर शहर | २४ | ८ |
| २) करवीर पेटा | ५० | - |
| ३) हातकणंगले | ५६ | - |
| ४) शिरोळ | २७ | - |
| ५) राधानगरी | ३३ | - |
| ६) पन्हाळा | २३ | - |
| ७) भुदरगड | १९ | - |
| ८) गडहिंग्लज | २४ | - |
| ९) शाहुवाडी महाल | १० | - |
| एकूण : | २६६ | ८ |

आधार : ॲड. शामराव शिंदे - कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका - अमृत महोत्सव स्मरणिका - १९८८

सारणी क्र. ३.२ वरून असे दिसून येते की, १९४५ पर्यन्त म्हणजे स्वातंत्र्यपूर्वकाळात कोल्हापूर संस्थानातील महाल व पेटयांमध्ये बँकाची संख्या फक्त ८ होती तर सोसायटयांची संख्या २६६ होती. विशेषत: फक्त कोल्हापूर शहरातच ८ सहकारी बँका आपला व्यवसाय करीत होत्या. इतर कोणत्याही पेटयात सहकारी बँकांची स्थापना झालेली नव्हती.

तसेच हातकणंगले पेटयात सर्वात जास्त सोसायटया स्थापन झालेल्या होत्या. त्या पाठोपाठ करवीर पेटयाचा क्रमांक लागतो. परंतु सर्वात कमी सोसायटया शाहुवाडी महालात कार्यरत होत्या.

स्वातंत्र्यपूर्व काळात कोल्हापूर संस्थानात सोसायटयांची संख्या मर्यादित होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व्यापारी बँकापेक्षा सहकारी बँका-मार्फत आर्थिक व औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी सहकार प्रेमींचे लक्ष लागले होते. सुदैवाने या क्षेत्रास वाहून घेणारे, निरलसपणे काम करणारे सेवाभावी वृत्तीचे नेते भेटले. त्याचा परिणाम जिल्हात ठिकठिकाणी बँका निघाल्या आणि त्यांना दृढ पायावर उभे करण्यात आले. सन १९८७ अखेर एकूण ४२ सहकारी बँका कार्यरत आहेत. मुंबई सोडल्यास इतक्या संस्थेने बँका असणारा महाराष्ट्रातील हा एकमेव जिल्हा आहे. गेल्या ७५ वर्षांतील या ४२ बँकाचा निर्मितीचा काळ सारणी क्र. ३.३ मध्ये दिला आहे.

सारणी क्र. ३.३

बँकांच्या निर्मितीचा काळ

| काळ | संख्या |
|---|---|
| १) सन १९१३ ते १९२० | ३ |
| २) सन १९२१ ते १९३० | २ |
| ३) सन १९३. ते १९४० | ४ |
| ४) सन १९४१ ते १९५० | २ |
| ५) सन १९५१ ते १९६० | ७ |
| ६) सन १९६१ ते १९७० | १० |
| ७) सन १९७१ ते १९८० | १२ |
| ८) सन १९८१ ते १९८७ | २ |
| एकूण : | ४२ |

आधार : अॅड. शामराव शिंदे - कोल्हापूरातील नागरी सहकारी बँका - अमृत महोत्सव स्मरणिका - १९८८

१९५१ ते १९८० या ३० वर्षांत २९ बँका निघाल्या. म्हणजे सरासरी वर्षाला एक बँक पडते. नियोजनाच्या प्रारंभीच्या काळात बँकांचा विकास झाला हे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. त्यानंतर शाखा वाढत गेल्या. पण बँका मात्र कमी निघाल्या.

स्वातंत्र्योत्तर काळात कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची वाढ अधिक गतीने झालेली दिसते. सध्या एकूण ४२ नागरी सहकारी बँका आपला व्यवसाय करीत आहेत. निरनिराळ्या तालुक्यात बँकांचा विस्तार कसा झाला त्याचा तपशील सारणी क्र. ३.४ मध्ये दिला आहे.

सारणी क्र. ३.४

तालुकावार बँकांचा विस्तार - ३०-६-१९८७

| | तालुका | बँका |
|---|---|---|
| १) | कोल्हापूर शहर | १५ |
| २) | करवीर | २ |
| ३) | हातकणंगले | ११ |
| ४) | शिरोळ | ४ |
| ५) | राधानगरी | - |
| ६) | पन्हाळा | २ |
| ७) | भुदरगड | - |
| ८) | गडहिंग्लज | २ |
| ९) | शाहुवाडी | - |
| १०) | कागल | ३ |
| ११) | आजरा | २ |
| १२) | चंदगड | १ |
| १३) | गगन बावडा | - |
| | एकूण : | ४२ |

आधार : जिल्हा उपनिबंधक कार्यालय, कोल्हापूर

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, कोल्हापूर जिल्हातही नागरी सहकारी बँकांच्या विकासात असमतोलता आहे. ३० जून, १९८७ अखेर जिल्हात एकूण ४२ बँका आपला व्यवसाय करीत होत्या. त्यापैकी कोल्हापूर शहरात सर्वात जास्त म्हणजे १५ नागरी सहकारी बँका स्थापन झाल्या आहेत. त्यांचे प्रमाण जवळजवळ ३६ टक्के आहे. कोल्हापूर शहरास लाभलेली नैसर्गिक, अनुकुलता, उत्साहवर्धक वातावरण, लहान मोठ्या उद्योग व्यवसायांचा विकास, व्यापारात होणारी सतत वाढ, विविध वस्तूंची बाजारपेठ, शेती उत्पादन तंत्रातील सुधारणा इत्यादी घटकांमुळे आणि लोकांच्या सहकारी वृत्तीमुळे नागरी सहकारी बँक चळवळीला उत्तेजन मिळाले आहे.

त्या बरोबरच या बँकांचा तालुकावार विस्तार विचारात घेतल्यास हातकणंगले तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे ११ नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत. एकूण बँकात त्याचे प्रमाण २६ टक्के आहे. या तालुक्यात बँकांची संख्या जास्त असण्याचे कारण म्हणजे इचलकरंजी शहराचा वाढता विकास होय. हातकणंगले तालुक्यातही या बँकाचा समतोल विकास झाला नाही तर एकट्या इचलकरंजी शहरात ८ बँकांची स्थापना झाली आहे. इचलकरंजी हे शहर लहान-मोठ्या उद्योग-व्यवसायांच्या विकासाचे व व्यापाराचे एक महत्वाचे केंद्र बनले आहे. शहरात व आसपासच्या परिसरात सुती कापड गिरण्यांचे केंद्रीकरण, शहरात लहान-मोठया प्रमाणात माग (सूत) व्यवसायाचा प्रचंड विकास, सुती कापडांचे मोठया प्रमाणावर उत्पादन यामुळेच या शहराला महाराष्ट्राचे ` मँचेस्टर ` मानले जाते. सहकारी सूत गिरण्या, सहकारी साखर कारखाना, कामगारांची वाढती संख्या व राजकीय दृष्टया या शहराला प्राप्त झालेले महत्त्व यातून या शहरात नागरी सहकारी बँकांचे केंद्रीकरण झाले आहे.

सहकारी बँकांची वाढ विशेष करून कोल्हापूर शहर, इचलकरंजी, जयसिंगपूर व गडहिंग्लज अशा ठिकाणी केंद्रीत झाली आहे. हुपरी, रेंदाळ,

कोडोली, आजरा, कुरुंदवाड, कुडित्रे, वडगांव, कागल, चंदगड अशा ग्रामीण व निमशहरी भागातही बँका स्थापन झाल्या आहेत. तथापि जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगरी भागात आणि विशेषत: गारगोटी, राधानगरी, गगनबावडा, शाहुवाडी, भुदरगड या भागात एकही बँक स्थापन झालेली नाही.

सारणी क्र. ३.५ मध्ये १९७७ ते १९८७ या दहा वर्षांतील नागरी बँकांच्या प्रगतीचा आढावा दिलेला आहे.

सारणी क्र. ३.५

कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची प्रगती
(१९७७ ते १९८७)

(रुपये लाखात)

| अनु. | बाब | ३० जून, १९७७ | ३० जून, १९८७ |
|---|---|---|---|
| १) | एकूण बँका | ३८ | ४२ |
| २) | सभासद संख्या | १.८५ | २.७३ |
| ३) | एकूण निधी | ४७७.२९ | १४६५.५२ |
| ४) | एकूण ठेवी | २४७७.२९ | १८७९६.२७ |
| ५) | दिलेली कर्जे | १७८७.८७ | १४१७२.१७ |
| ६) | खेळते भांडवल | २०६१.१७ | २०९३९.०५ |
| ७) | थकबाकी | ४७७.२९ | ११८८.६० |
| ८) | नफा | ५५.२५ | २७३.४६ |

आधार : कोल्हापूर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, कोल्हापूर.

सारणी क्र. ३.५ वरून असे दिसून येते की, १९७७-८८ या दहा वर्षांत बँकांची संख्या ३८ वरून ४२ पर्यन्त वाढली. म्हणजे बँकांच्या संख्येत जवळजवळ १० टक्के वाढ झाली आहे. सभासद संख्येत दीड पटीपेक्षा अधिक वाढ झाली. ठेवींच्या रक्कमेत साडे सात पटीने तर कर्ज वितरणात जवळ-जवळ ८ पटीने वाढ झाली आहे. नफ्याचे प्रमाणही ५ पटीने वाढले. यावरून असे स्पष्ट होते की, बँकांच्या संख्येतील वाढ जरी कमी प्रमाणात असली तरी इतर बाबीत मात्र चांगली वाढ झाली आहे. याचा अर्थ नागरी सहकारी बँका जिल्ह्यातील लोकांना बँकींग व्यवहारात आकर्षित करून घेण्यात यशस्वी झाल्या आहेत.

३.४ कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी
बँकांचा तपशील :

सारणी क्र. ३.६ व ३.७ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ४२ नागरी सहकारी बँकांच्या काही विशिष्ट बाबींविषयी आर्थिक स्थिती व उच्चांकाचे क्रमांक दिलेले आहेत. त्यावरून वेगवेगळ्या बाबींमधील बँकांची वस्तुस्थिती निदर्शनास येते.

३० जून १९८७ अखेर कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ४२ नागरी बँकांची स्थापना झाली असून, सर्वप्रथम दि. १६-३-१९१३ रोजी दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँकेची स्थापना झाली तर शेवटी दि. २८/२/१९८७ रोजी दि गणेश सहकारी बँक लि., कुरुंदवाड या बँकेची स्थापना झाली.

जिल्ह्यातील एकूण ४२ नागरी बँकांमध्ये सर्वात जास्त सभासद संख्या दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँकेची आहे. या बँकेची स्थापना ९ व्या क्रमांकाला होऊन सुध्दा सभासद संख्येत या बँकेने उच्चांक प्रस्थापित केला आहे. सर्व बँकांच्या एकूण सभासद संख्येत त्यांचे प्रमाण ७ टक्के आहे. सरासरी सभासद संख्या ६७४९ असून या सभासद संख्येच्या वर २० बँका व सरासरीच्या खाली २२ बँका आहेत. म्हणजे जवळजवळ निम्म्या बँका सरासरीच्या वर आणि खाली आहेत.

वसूल भाग भांडवलाच्या बाबतीत दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेने जिल्हात उच्चांक प्रस्थापित केला आहे. या बँकेचे वसूल भाग भांडवल रू. १९१.९१ लाख असून एकूण भाग भांडवलात हे प्रमाण २१ टक्के आहे. वसूल भाग भांडवलाची सरासरी रू. २१.७८ लाख असून सरासरीच्या वर असणाऱ्या बँकांची संख्या १३ आहे. तर २९ बँका सरासरीच्या खाली आहेत. म्हणजेच सरासरीच्या वर असणाऱ्या बँकांचे प्रमाण ३१ टक्के आहे.

खेळत्या भांडवलाबाबत इचलकरंजी जनता सहकारी बँकेचा प्रथम क्रमांक लागतो. या बँकेचे खेळते भांडवल रू. २०७८.६१ लाख असून जिल्हातील बँकांच्या (नागरी) एकूण खेळत्या भांडवलात त्याचे प्रमाण ९ टक्के आहे. सरासरी खेळते भांडवल रू. ५५४.३१ लाख असून या सरासरीच्या वर १४ बँका आहेत तर सरासरीच्या खाली २८ बँका आहेत.थोडक्यात एक तृतियांश बँका सरासरीच्या वर आहेत.

कोणतीही बँक आपला बँकिंग व्यवसाय करताना अनेक महत्वाची कार्ये पार पाडीत असते. त्यापैकी अत्यंत महत्वाचे कार्य म्हणजे ठेवी स्वीकारणे होय. जास्तीतजास्त ठेवी गोळा करण्यामध्ये इचलकरंजी जनता सहकारी बँकेचा जिल्हात प्रथम क्रमांक लागतो. या बँकेने एकूण १७३४.९१ लाख रूपयांच्या ठेवी संकलित केल्या असून एकूण ठेवीशी हे प्रमाण ९ टक्के आहे. तसेच सरासरी ठेव रू. ४४७.५० लाख असून सरासरीच्या वर १३ बँका आहेत. तर सरासरीच्या खाली २९ बँका आहेत. वास्तविक पाहाता सरासरीच्या वर असणाऱ्या बँकांची संख्या वाढणेसाठी बँकानी मोठया प्रमाणात ठेवी गोळा करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

कर्ज वितरणाच्या बाबतीतही इचलकरंजी जनता सहकारी बँकेने उच्चांक गाठलेला आहे. या बँकेने ११०२ लाख रूपये कर्जाचे वाटप केले आहे. सर्व बँका मिळून एकूण १४,३७९.८७ लाख रूपये कर्जाचे वितरण केले आहे. त्यात या बँकेचे प्रमाण ८ टक्के आहे. सरासरी कर्ज वितरण रू. ३४२.३७

लाख असून या सरासरीच्या वर असणा-या बँकांची संख्या १५ आहे. तर सरासरीच्या खाली २७ बँका आहेत. सरासरीच्या वर असणा-या बँकाचे प्रमाण ३६ टक्के आहे.

सेअर्स भांडवल, ठेवी आणि कर्ज वितरण या तीनही बाबीत इचलकरंजी जनता सहकारी बँकेने जिल्हात उच्चांक प्रस्थापित केला आहे. जिल्हात २३ व्या क्रमांकाला बँकेची स्थापना होऊनही तीन महत्वाच्या क्षेत्रात या बँकेने नेत्रदिपक प्रगती करून जिल्हातील मानाचे स्थान प्रस्थापित केले आहे.

राखीव निधीच्या बाबतीत श्री. वीरशैव कॉ-ऑप. बँकेचा प्रथम क्रमांक लागतो. या बँकेचा राखीव निधी रुपये १५८-९८ लाख असून एकूण राखीव निधीत हे प्रमाण १० टक्के आहे. तसेच सरासरी राखीव निधी रुपये ३७.२७ लाख असून, १५ बँका या सरासरीच्या वर आहेत व २७ बँका सरासरीच्या खाली आहेत.

नागरी बँकांच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची गोष्ट म्हणजे बँकांना झालेला निव्वळ नफा होय. या नफ्याच्या बाबतीतही श्री. वीरशैव कॉ-ऑप. बँकेचा प्रथम क्रमांक लागतो. या बँकेने २६.८६ लाख रुपये नफा मिळविला असून एकूण बँकातील नफ्यात त्याचे प्रमाण १० टक्के आहे. सरासरी नफा रुपये ६.५१ लाख असून सरासरीच्या वर १५ बँका तर सरासरीच्या खाली २७ बँका आहेत.

शाखा विस्ताराबाबतही श्री. वीरशैव कॉ-ऑप. बँकेचा सर्वात वरचा क्रमांक लागतो. या बँकेच्या एकूण १० शाखा कार्यरत असून एकूण शाखेत त्याचे प्रमाण ६ टक्के आहे. तसेच शाखांची सरासरी संख्या ४ असून सरासरीच्या वर १९ बँका आहेत तर सरासरीच्या खाली २३ बँका आहेत.

## सारणी क्र. ३.६

### कोल्हापूर जिल्हातील नागरी सहकारी बँकांची माहिती (३०-६-१९८७)

(रुपये लाखात)

| अनु. | बँकेचे नाव | स्थापना | सभासद | उतरत्या-कातील क्रमांकन | वसूल भाग भांडवल | उतरत्या-कातील क्रमांकन | खेळते भांडवल | उतरत्या-कातील क्रमांकन | एकूण ठेवी | उतरत्या-कातील क्रमांकन | एकूण कर्जे | उतरत्या-कातील क्रमांकन | राखीव निधी | उतरत्या-कातील क्रमांकन | नफा | उतरत्या-कातील क्रमांकन | शाखा | उतरत्या-कातील क्रमांकन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| १. | दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | १६-३-१३ | १२९६२ | ४ | ३१.७२ | ७ | ११७५.७८ | ६ | ९६९.८३ | ७ | ५५६.६१ | ११ | ११४.०५ | ४ | १८.९६ | ४ | ६ | ५ |
| २. | श्री. बलभिम को-ऑप.बँक लि., कोल्हापूर | १७-१०-१५ | १३५९९ | ३ | ४९.९५ | ३ | ७४१.१५ | १३ | ६०५.६७ | १२ | ५२०.२९ | १२ | ३७.१७ | १६ | ६.१० | १८ | ५ | ६ |
| ३. | कोल्हापूर जिल्हा गव्हर्नमेंट सर्व्हन्टस् को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | ३-७-१७ | ८४०२ | १३ | ४९.५६ | २ | २७७.६० | २६ | १४०.४७ | २१ | ११२.५० | ३० | ६५.५० | २६ | ६.२९ | १६ | ४ | ७ |
| ४. | दि कागल को-ऑप. बँक लि., कागल. | १९१७ | ३२९७ | ३२ | ६.९४ | ३४ | २५०.७४ | २७ | १८४.३७ | २७ | १८५.०५ | २५ | २०.९७ | २३ | २.६२ | ३० | ३ | ८ |
| ५. | दि रविवार पेठ को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | २२-८-२४ | ८५७६ | १२ | १४.२७ | २१ | २८९.९६ | २४ | २१७.३४ | २५ | १७१.७९ | २६ | १७.७८ | २५ | २.७४ | २१ | ३ | ८ |
| ६. | श्री. शाहू को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | १४-३-२७ | १२२०५ | ५ | २२.७४ | ११ | ४३४.६४ | १७ | ३६६.७० | १५ | २७९.११ | १७ | १४.७८ | २७ | ३.२३ | २५ | ६ | ५ |
| ७. | इचलकरंजी अर्बन को-ऑप. बँक लि., इचलकरंजी | २६-८-३० | ७११३ | १९ | ३३.९९ | ६ | ८४५.७५ | ११ | ७४९.७९ | १० | ६७४.४७ | ८ | ७७.४२ | ६ | ७.४६ | १३ | ४ | ७ |
| ८. | श्री. महालक्ष्मी को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | १०-१०-३३ | ८३४९ | १४ | २५.४१ | १० | १०१५.५३ | १० | ७८०.३४ | ९ | ५९६.८५ | ९ | १००.२१ | ५ | १५.१७ | ५ | ५ | ६ |
| ९. | दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | २०-१०-३३ | १८९९१ | १ | ४७.४७ | ४ | १५१०.७९ | ४ | १२९४.२९ | ४ | ९५६.२७ | ३ | ७७.४१ | ७ | २२.५४ | २ | १ | २ |
| १०. | श्री. महावीर को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | ११-५-३७ | ६९१४ | २० | १७.८७ | १७ | ११३५.६१ | ७ | १०३१.४२ | ६ | ७५८.०२ | ६ | ४५.०८ | १३ | ४.८१ | २० | १ | २ |
| ११. | दि प्राथमिक शिक्षक सह. बँक लि., कोल्हापूर | १२-१०-३९ | ७५१८ | १७ | १११.११ | १ | १०९८.२१ | ८ | ३०१.०१ | २१ | ९४१.०१ | ४ | ४७.११ | ११ | २०.०२ | ३ | १ | २ |

सारणी क्र. ३.६ (पुढे चालू...)

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२. | वीरशैव को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | २१-२-४२ | १०८६२ | ९ | १९.८९ | १५ | १८३५.७८ | २ | १६०१.३७ | २ | १०५६.१८ | २ | १५६.९८ | १ | २६.८६ | १ | १० | १ |
| १३. | दि मुरगुड सहकारी बँक लि., मुरगुड | १५-१२-४७ | २०१२ | ३८ | ५.१० | ३९ | ९८.४२ | ३६ | ६१.३५ | ३९ | ५२.६१ | ३६ | २२.९८ | २० | ३.०६ | २६ | १ | १० |
| १४. | श्री. पैसाफंड शेतकरी सह. बँक लि., हुपरी | २४-१-५० | ६१५६ | २२ | १७.३४ | १८ | २०८.६४ | २८ | १२६.५६ | ३० | ११२.९२ | २९ | २१.१६ | २२ | २.७६ | २८ | ४ | ७ |
| १५. | दि गडहिंग्लज अर्बन को-ऑप. बँक लि., गडहिंग्लज | १३-११-५० | २३२९ | ३७ | ४.७५ | ४१ | २९८.८४ | २३ | २४६.५९ | २३ | २०६.७५ | २२ | ३३.१९ | १७ | ६.१५ | १७ | १ | १० |
| १६. | दि कुरूंदवाड अर्बन को-ऑप. बँक लि., कुरूंदवाड | १२-४-५६ | ३८५२ | ३० | १६.६६ | १९ | ४२३.०८ | १८ | ३५०.८६ | १७ | २५५.९५ | १९ | ३७.८९ | १४ | ७.१४ | १२ | ५ | ६ |
| १७. | दि वडगांव को-ऑप. बँक लि., वडगांव | १२-१०-५७ | ५५४१ | २३ | १२.१३ | २३ | ४१७.९६ | १९ | ३४५.९७ | १८ | २६०.८३ | १८ | ३७.८२ | १५ | ९.५७ | ९ | ५ | ६ |
| १८. | जयसिंगपूर-उदगांव सहकारी बँक लि., जयसिंगपूर | २२-६-६० | २४९९ | ३६ | ५.६६ | ३८ | ४५.१४ | ४१ | ७१.०१ | ३७ | ४३.६९ | ३८ | ४.५० | ४२ | १.१७ | ३७ | १ | १० |
| १९. | दि आजरा अर्बन को-ऑप. बँक लि., आजरा | १९-१०-६० | ५५३९ | २४ | २२.५२ | १३ | १२८३.३० | ५ | ११२८.८६ | ५ | ७०२.५८ | ७ | ५४.४२ | १० | १२.४० | ६ | १० | १ |
| २०. | दि कोल्हापूर जनता सह. बँक लि., कोल्हापूर | १७-११-६० | ११७७३ | ६ | २०.४५ | १४ | १०८८.४७ | ९ | ८७७.९८ | ८ | ५६३.८२ | १० | ३२.०९ | १८ | ४.८३ | १९ | ६ | ५ |
| २१. | दि कमर्शियल को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | २६-१-६२ | ७७१८ | १५ | ११.५० | २७ | ३५५.२३ | २२ | ३०९.८५ | २० | १८६.०७ | २४ | १४.३९ | २८ | ३.५३ | २४ | ३ | ८ |
| २२. | नागरी सहकारी बँक लि., कोडोली | २७-१०-६२ | १४७९२ | २ | १२.०८ | २४ | १४०.३४ | ३४ | १०२.२१ | ३४ | ८९.०४ | ३२ | ७.७४ | ३७ | १.७८ | ३४ | २ | ९ |
| २३. | इचलकरंजी जनता सह. बँक लि., इचलकरंजी | ५-११-६२ | ९६९६ | १० | ४४.०३ | ५ | २०७८.६१ | १ | १७३४.९८ | १ | ११०२.०० | १ | ११७.१३ | २ | ११.०४ | ८ | ७ | ४ |
| २४. | पिपल्स को-ऑप. बँक लि., इचलकरंजी | २१-१२-६२ | ११६६९ | ७ | २२.६८ | १२ | ७१९.५२ | १४ | ५९९.९२ | १३ | ४८०.७२ | १४ | ५४.५५ | ९ | ७.२२ | १४ | २ | ९ |
| २५. | जनता सहकारी बँक लि., आजरा | २-६-६३ | ५१५८ | २५ | १८.१४ | १६ | ३७३.१४ | २० | २८९.७४ | २२ | २३८.८५ | २० | १२.१५ | ३० | ४.१३ | २३ | ५ | ६ |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७ | १८. | १९. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६. | रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ | १७-८-६४ | १८७४ | ३९ | ६.१४ | ३७ | ८०.३४ | ३९ | ४६.८९ | ४१ | ६३.४४ | ३५ | ६.२३ | ३८ | १.७१ | ३५ | १ | १० |
| २७. | श्री. वारणा सहकारी बँक लि., वारणानगर | २८-२-६६ | ७२०३ | १८ | २९.६५ | ८ | १५३८.६२ | ३ | १२९९.८९ | ३ | ८७४.६३ | ५ | ११४.५१ | ३ | ११.७३ | ७ | ८ | ३ |
| २८. | दि इचलकरंजी कामगार नागरी सहकारी बँक लि., इचलकरंजी | ६-९-६९ | ४०१८ | २६ | ४.७७ | ४० | ९३.१७ | ३७ | ७७.०२ | ३६ | ३९.९६ | ४१ | ८.८३ | ३५ | ०.४२ | ४१ | १ | १० |
| २९. | श्री भरत अर्बन को-ऑप. बँक लि., जयसिंगपूर | १८-१-७१ | ११४१० | ८ | २८.०७ | ९ | ७४५.६२ | १२ | ६३०.८३ | ११ | ५०८.६९ | १३ | ४५.५६ | १२ | ९.१० | १० | ५ | ६ |
| ३०. | नूतन नागरी सहकारी बँक लि., इचलकरंजी | ३१-३-७१ | ३११० | ३४ | ९.७३ | २९ | ४३९.८० | १६ | ३५६.५० | १६ | ११३.३७ | २३ | १८.२५ | २४ | ४.५२ | २१ | १ | १० |
| ३१. | शिवाजी सहकारी बँक लि., गडहिंग्लज | ८-१०-७१ | २७६८ | ३५ | ८.७२ | ३० | १४८.५६ | ३१ | ११६.५० | ३१ | ९३.५३ | ३१ | ११.४७ | ३१ | १.९४ | ३३ | १ | १० |
| ३२. | श्री.पंचगंगा नागरी सह.बँक लि., कोल्हापूर | २०-२-७२ | ३९६१ | २७ | १२.०० | २५ | २८२.०० | २५ | २४४.०० | २४ | १७१.०० | २७ | १०.०० | ३३ | ३.०० | २७ | १ | १० |
| ३३. | शिवनेरी सहकारी बँक लि., इचलकरंजी | १८-४-७२ | ३९०४ | २८ | १५.५४ | २० | ५१२.४४ | १९ | ३७४.५० | १४ | २९०.६३ | १६ | ७३.८२ | ८ | ७.११ | १५ | २ | ९ |
| ३४. | कोल्हापूर महिला सहकारी बँक लि., कोल्हापूर | १५-५-७२ | ७५५९ | १६ | ७.३७ | ३३ | ११३.२३ | ३५ | ९२.३० | ३५ | ६५.०३ | ३३ | ४.६८ | ४१ | - | - | ३ | ८ |
| ३५. | इचलकरंजी महिला सहकारी बँक लि., इचलकरंजी | २९-९-७२ | ३८५५ | २९ | ८.०० | ३२ | १८१.६८ | २९ | १५६.६२ | २८ | ३८५.३२ | १५ | १०.७८ | ३२ | १.०४ | ३८ | १ | १० |
| ३६. | यशवंत सहकारी बँक लि., कुडित्रे | २२-६-७४ | ६१६९ | २१ | १०.२० | २८ | १४५.१८ | ३३ | ११५.०२ | ३२ | ६४.१८ | ३४ | १३.४६ | २९ | २.४७ | ३१ | २ | ९ |
| ३७. | यूथ डेव्हलपमेंट कोऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर | २१-७-७६ | ९१०९ | ११ | ११.५२ | २६ | १७४.५८ | ३० | २१४.४१ | २६ | १४५.९५ | २८ | ९.०७ | ३४ | २.०५ | ३२ | १ | १० |

सारणी क्र. ३.६ (पुढे चालू....)

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८. | कुंभी कासारी सह. बँक लि., कुडित्रे | २३-७-७६ | ३६१७ | ३१ | ६.१८ | ३६ | १४४.[illegible] | ३२ | १०५.१८ | ३३ | ४३.६४ | ३९ | २४.२३ | १९ | ४.१५ | २२ | १ | १० |
| ३९. | दुध साखर को-ऑप. बँक लि., मौनीनगर | २४-२-७९ | १२७३ | ४१ | ४.६० | ४२ | ५०.७७ | ४० | ३०.४४ | ४२ | ४३.३१ | ४० | ८.६५ | ३६ | ०.८७ | ३९ | १ | १८ |
| ४०. | चौंडेश्वरी सहकारी बँक बँक लि., इचलकरंजी | १५-२-८२ | ३११४ | ३३ | १३.४५ | २२ | ३६५.४३ | २१ | ३११.२५ | १९ | २१३.२४ | २१ | २१.७५ | २१ | ८.०१ | ११ | २ | ९ |
| ४१. | चंदगड अर्बन को-ऑप. बँक लि., चंदगड | ६-५-८२ | १४७७ | ४० | ८.०९ | ३१ | ३८.९२ | ४२ | ५२.३२ | ४० | ३६.३७ | ४२ | ४.७५ | ४० | १.५७ | ३६ | १ | १० |
| ४२. | दि गणेश सहकारी बँक लि., कुरूंदवाड | २८-२-८७ | १२६५ | ४२ | ६.२८ | ३५ | ८३.२२ | ३८ | ६७.२० | ३८ | ५१.६० | ३७ | ५.०९ | ३९ | ०.५१ | ४० | १ | १० |
| | एकूण (४२) | | २८३४४८ | | ९१५.०७ | | २३२८१.१६ | | १८७९५.३७ | | १४३७९.८७ | | १५६५.६२ | | २७३.४६ | | १५८ | |
| | सरासरी ( एकूण / ४२ ) | | ६७४९ | | २१.७८ | | ५५४.३१ | | ४४७.५० | | ३४२.३७ | | ३७.२७ | | ६.६७* | | ४ | |

आधार : नागरी सहकारी बँकांचे संबंधित वर्षांचे वार्षिक अहवाल.

*४१ बँकांची सरासरी.

राखीव निधी, नफा व शाखा विस्तार या तीन बाबीत श्री. वीरशैव को-ऑप. बँकेने उच्चांक प्रस्थापित केला आहे. जिल्हात १२ व्या क्रमांकाला स्थापन झालेल्या या बँकेने निश्चितच आपल्या व्यवसायात चांगली प्रगती केली आहे.

सारणी क्र. ३.७

कोल्हापूर जिल्हातील नागरी सहकारी बँकांचा
विशिष्ट क्षेत्रातील उच्चांक
(३० जून, १९८७ अखेरच्या स्थिती आधारे)

| तपशील | बँकेचे नाव | उच्चांक स्थिती |
|---|---|---|
| एकूण सभासद संख्या | दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | १८,९११ |
| शाखा विस्तार | श्री. वीरशैव को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | १० |
| वसूल भाग भांडवल | दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., कोल्हापूर | रु.१९१.९१ लाख |
| खेळते भांडवल | इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी | रु. २०७८.६१ लाख |
| एकूण ठेवी | इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी | रु. १७३४.९८ लाख |
| एकूण कर्जे | इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी | रु. ११०२.०० लाख |
| राखीव निधी | श्री. वीरशैव को-ऑप. बँक लि., कोल्हापूर | रु. १५८.९८ लाख |
| नफा | श्री. वीरशैव को-ऑफ बँक लि., कोल्हापूर | रु. २६.८६ लाख |

आधार : संकलित, नागरी सहकारी बँकांचे संबंधित वर्षांचे वार्षिक अहवाल.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

३.५ उपसंहार :

कोल्हापूर संस्थानचे छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्या प्रेरणेने व ना. भास्करराव जाधव यांच्या कुशल मार्गदर्शनाने, कोल्हापूरात सहकारी चळवळीने जन्म घेतला. ता. २४-५-१९१३ रोजी ` दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. सोसायटी लि.,` या संस्थेची स्थापना झाली आणि कोल्हापूर संस्थानात कायदेशीर सहकारी चळवळ सुरू झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात सहकारी संस्थांच्या वाढीचा वेग थोडासा कमी होता, मात्र स्वातंत्र्या-नंतर कोल्हापूरातील सहकारी चळवळीचा प्रचंड विकास झाला. स्वावलंबन, जिद्द, काटकसर, महत्वाकांक्षा, परस्पर साहाय्य इत्यादी गुणांमुळे जिल्ह्यातील सहकारी चळवळीने विविध क्षेत्रात प्रवेश केला व समाजातील लोकांचे जास्तीत जास्त कल्याण व्हावे या हेतूनेच विभिन्न क्षेत्रात सहकारी संस्थांची स्थापना केली. त्यामुळेच संपूर्ण जिल्हा सहकारमय झाला म्हणूनच महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीला एक आगळे वेगळे स्थान प्राप्त होऊ शकले.

नागरी सहकारी बँकांच्या विकासाबाबतही महाराष्ट्रात या जिल्ह्याचा बराच वरचा क्रमांक लागतो. आज जिल्ह्यात सुमारे ४२ नागरी सहकारी बँक यशस्वी वाटचाल करीत आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणामुळे नागरी सहकारी बँका अधिक समाजाभिमुख व राष्ट्रीय विकासाभिमुख झाल्या आहेत. स्वयंरोजगार, व्यापार,उद्योगधंदे, घरबांधणी आणि राष्ट्रीय उत्पन्नात भर घालणारे व्यवसाय अशासारख्या ` उत्पादित ` कर्ज देण्यावर भर दिला असून, गृहोपयोगी अगर ज्याद्वारे उत्पादन वाढणार नाही अशा ` अनुत्पादित ` कारणासाठीच्या कर्जावर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. ख-या अर्थाने सहकारी बँका राष्ट्रीय आर्थिक विकासात महत्वाचे माध्यम झालेल्या आहेत. या दृष्टीनेही या जिल्ह्यातील सहकारी बँकांचे कार्य उल्लेखनीय आहे.

रिझर्व बँकेत अर्बन बँक डिपार्टमेंट आहे. त्याचे प्रमुख श्री. जैन (१९८७) यानी सूत्रे हाती घेतल्यानंतर व्यवहारी दृष्टीकोन स्वीकारला आणि बहुतांश बँकांना लायसेन्स दिली आहेत. या जिल्हातील ४२ बँकांपैकी ३२ बँकांना लायसेन्स मिळाली आहेत.

शाखा विस्ताराबाबत रिझर्व बँकेने वास्तववादी धोरण ठेवल्यास सहकारी बँकांच्या ब-याच समस्या कमी होतील. या जिल्हातील मोठया पतसंस्थांचे बँकेत रूपांतर करणे, नवीन बँका स्थापनेस परवानगी देणे या मागण्या मान्य झाल्यास किमान २० बँका नजीकच्या काळात निर्माण होतील व त्या सक्षम होतील यात संशय नाही.

नागरी सहकारी बँका या प्रामुख्याने अग्रक्रम क्षेत्रातील व्यक्ती व संस्थांना कर्ज पुरवठा करीत असल्यामुळे थकबाकी, कर्ज वसुली यासारखे प्रश्न उपस्थित होऊ शकतात. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी कोणतेही हितसंबंध नसणा-या व नि:पक्षपातीपणे काम करणा-या व्यवस्थापनाची निर्मिती करणे आवश्यक आहे.

तसेच नागरी सहकारी बँका अधिक सक्षम बनविण्यासाठी त्यांच्या उत्पादकतेमध्ये वाढ घडवून आणण्याची आवश्यकता आहे. उत्पादकतेमध्ये उपलब्ध असणा-या साधनसामुग्रीचा अधिक कार्यक्षमतेने वापर कसा होईल हा विचार अंतर्भूत आहे. यामध्ये केवळ वित्तीय साधनांचा विचार करून चालणार नाही. तर इतर भौतिक व मानवी साधन सामुग्रीचा कार्यक्षमतेने वापर करण्याचा विचार अपेक्षित आहे. या दृष्टीने प्रामुख्याने नागरी सहकारी बँकांना मनुष्यबळाचे नियोजन करावे लागेल.

कोल्हापूर जिल्हातील नागरी सहकारी बँकांच्या स्थापनेस जो स्थानिक असमतोल निर्माण झाला आहे तो दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावा. या बाबतीत जिल्हाची शिखर बँक कोल्हापूर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप.

बँकेने पुढाकार घ्यावा, पहाणी करावी आणि ज्या भागात अजूनही बँकांची स्थापना झाली नाही त्या जिल्हाच्या पश्चिमेकडील भागात नागरी बँका स्थापन करण्यासाठी जरूर ते सहकार्य करावे व प्रोत्साहन द्यावे.

## संदर्भ

१) ॲड. शामराव शिंदे : सहकाराची गंगोत्री - अर्बन बँक
दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक अमृत महोत्सव स्मरणिका, १९८८, पा.क्र. १.

२) तथोक्त, पा.क्र. २

३) तथोक्त, पा.क्र. २

४) तथोक्त, पा.क्र. ३

५) तथोक्त, पा.क्र. ४

६) ॲड. शामराव शिंदे : कोल्हापूर जिल्हातील नागरी सहकारी बँका
दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक अमृत महोत्सव स्मरणिका, १९८८, पा.क्र. ८८

७) महाल : सर्वसाधारणपणे जिल्हा
पेटा : महालाचा पोट भाग
मराठी शब्द रत्नाकर, वा.गो. आपटे, पुर्नमुद्रण, १९९० या संदर्भावरून.